माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों. क्र. २००६९९/२०/अ. क्र. ५९५/२३/०१**

**श्री. अशोक कृष्णा मस्कर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का-१) जी/उत्तर विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय, खोली क्र. ३८,
१ला मजला, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प), मुंबई ४०० ०२८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता, जी/उत्तर विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय, खोली क्र. ३८,
१ला मजला, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प), मुंबई ४०० ०२८.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.०६.२०२३</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ११.११.२०१९ | १०.१२.२०१९ | २६.१२.२०१९ | २३.०१.२०२० |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०३.०२.२०२० रोजीच्या अर्जान्वये खालील कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

"मी संबंधित मुळ अर्ज माहितीचा अधिकार माहितीचा अधिनियम २००५ दि. ११-११-२०१९ रोजी मा. जन माहिती अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी DO-I, सहाय्यक अभियंता (इ व का) धारावी, जी / उत्तर विभाग कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका, हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (प), मुंबई-४०००२८ यांच्याकडे जी / उत्तर विभागाच्या हद्दीमधील संत रोहिदास मार्ग, सायन (प.), मुंबई ४०००१७ या ठिकाणी - असलेल्या अशोक सिल्क मिल कंपाऊडमधील एकुण अनधिकृत बांधकामावर दि. ०९-११-२०१९ रोजी केलेल्या कारवाईची सर्व माहिती व प्रती मिळण्याबाबत अर्ज दाखल केला होता.

**क्र. मुमाआ/नों. क्र. २००६९९/२०/अ. क्र. ५९५/२३/०१**

त्यानुसार त्यांच्या कार्यालयाचे पत्र जावक क्र. सआजीउ / ४०८४८/ स. ओ. (इ. व का.) धारावी, दि. १०-१२-२०१९ रोजीच्या पत्राद्वारे मला लेखी अपुर्ण माहिती दिली आहे. म्हणून भी नाईलाजाने दिनांक २६-१२-२०१९ रोजी मा. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्रथम अपिल दाखल केले होते.

त्याची सुनावणी दि. २२-०१-२०१९ रोजी घेण्यात आली. सदर सुनावणी दरम्यान मी मागितलेली माहिती संकेतस्थळावरून काढून निशुल्क यावी व अभिप्रेत असलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध नसल्यास, सदर माहिती कार्यालयीन अभिलेखामध्ये उपलब्ध असल्यास सदर माहितीच्या छायांकित प्रती नि:शुल्क देण्याचे आदेश मा. जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (इ व का) - ०१, जी / उत्तर विभाग यांना असे आदेश देण्यात आले.

परंतु मी माझ्या माहिती अधिकार अर्जात स्पष्टपणे दि.०९-११-२०१९ रोजी अशोक सिल्क मिल कंपाऊड मधील एकुण अनधिकृत बांधकामावर केलेल्या कारवाईची सर्व माहिती व प्रती मिळण्याबाबत अर्ज केला होता. तरी देखिल मला जाणीवपूर्वक पदनिर्देशित अधिकारी DO-I, सहाय्यक अभियंता (इ व का) धारावी, जी / उत्तर विभाग यांनी माहिती दिलेली नाही. तसेच अपिलीय अधिकारी यांनी देखिल जन माहिती अधिकारी यांना सहकार्य करून मला जाणीवपूर्वक मी मागितलेली माहिती मोघम स्वरूपाची असल्याचे दर्शवून मला माहिती दिलेली नाही . तरी मला संबंधित संपूर्ण खरी माहिती मिळावी म्हणून मी नाईलाजाने दुसरे अपिल दाखल करीत आहे."

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. ११.११.२०१९ अन्वये खालील माहिती विचारलेली आहे:-

"जी / उत्तर विभागाच्या हद्दीमधील संत रोहिदास मार्ग, सायन (प.), मुंबई-४०००१७ या ठिकाणी असलेल्या अशोक सिल्क मिल कंपाऊंडमधील एकुण अनधिकृत बांधकामावर दि.०९-११-२०१९ रोजी केलेल्या कारवाईची सर्व माहिती व प्रती मिळण्याबाबत."

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जासोबत जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि.१०-१२-२०१९ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि.२३-०१-२०२० संलग्न केले आहेत.

**जन माहिती अधिकारी यांनी दि.१०-१२-२०१९ रोजी खालीलप्रमाणे उत्तर दिले :**

"कृपया आपला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दि.११-०१-२०१९ रोजी या कार्यालयात प्राप्त झालेला अर्ज अवलोकित करावा. मुद्दा क्र. ३ मधील ३) १ ते ८- सदर बाबत आपणांस

## क्र. मुमाआ/नों. क्र. २००६९९/२०/अ. क्र. ५९५/२३/०१

अपेक्षीत असलेली माहिती महापालिकेच्या www.removalofencroachment.mcgm.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून RTI Tab वरुन संदर्भ क्र.१००००८ आपणांस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन घ्यावी."

**प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२३-०१-२०२० रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले :**

"जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ.व.का.) ०१ जी / उत्तर विभाग यांनी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार कायदा अंतर्गतच्या अर्जास विहित वेळेत उत्तर दिले असले तरी सदरचे उत्तर असमाधानकारक असल्याचे निदर्शनास येते.

दि.०९-११-२०१९ रोजी जन माहिती अधिकारी कार्यालयामार्फत अशोक मिल कंपाऊंड येथील विविध अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार कायदा अंतर्गतच्या अर्जान्वये विशिष्ट बांधकामासंदर्भातील माहितीची मागणी न करता मोघम स्वरुपाची मागणी केली आहे. अपिलार्थी यांनी ०७ दिवसात एका विशिष्ट अनधिकृत बांधकामासंदर्भातील माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांनी परिपत्रक क्र. एमओएम / १३१०, दि.२०-११-२०१२ चे अवलोकन करून अपीलार्थी यांचे सुविधेनूसार त्यांना अभिप्रेत असलेली माहिती संकेतस्थळावरुन काढून निशुल्क द्यावी. अपिलार्थीत अभिप्रेत असलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध नसल्यास आणि सदर माहिती कार्यालयीन अभिलेखामध्ये उपलब्ध असल्यास सदर माहितीच्या छायांकित प्रती अपिलार्थी यांना निशुल्क द्याव्यात. तसेच अपिलार्थी यांना आवश्यक परंतु कार्यालयीन अभिलेखामध्ये उपलब्ध नसलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थी यांना स्पष्ट लेखी स्वरुपात कळविण्यात यावे. असे आदेश जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ.व.का.) ०१. जी/उत्तर विभाग यांना देऊन उपरोक्त अपील अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या नियमास अनुसरुन निकाली काढण्यात येत आहे."

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी सादर केले की, त्यांना माहिती प्राप्त नाही. प्रथम अपिलचे आदेशानंतर माहिती प्राप्त नाही.

माहिती अधिकारी यांनी सादर केले की, अनधिकृत बांधकाम संबंधी माहिती महानगरपालिकेच्या RETMS पोर्टलवर उपलब्ध आहे व या आशयाचे उत्तर अपिलार्थीला दिले होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विशिष्ट अनधिकृत बांधकाम संबंधी माहितीची मागणी केली तर ७ दिवसात देण्याचे आदेशित केले

होते. तथापि, कोणतीही विशिष्ट अनधिकृत बांधकाम संबंधी कारवाई बाबतची मागणी अपिलार्थी द्वारे करण्यात आलेली नाही.

विचारलेवर माहिती अधिकारी यांनी सादर केले की, अनिधिकृत बांधकामावर करण्यात आलेल्या कारवाईची संपूर्ण माहिती RETMS पोर्टलवर उपलब्ध आहे. माहिती संकेतस्थळावर उपलब्ध नाही असे प्रथम अपिल अर्ज व द्वितीय अपिल अर्ज व सुनावणीच्या वेळी युक्तिवाद नाही.

जी माहिती स्वयंप्रेरणेने विभागाद्वारे प्रकाशित असेल तर ती माहिती माहितीचा अर्ज करुन मागता येत नाही. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक : १६.०६.२०२३

State Information Commission ★ Maharashtra ★

(सुनील पोरवाल)
राज्य मुख्य माहिती आयुक्त